**“किंमत संनियंत्रण कक्षांचे बळकटीकरण करणे (Strengthening of Price Monitoring Cell)” या १००% केंद्रपुरस्कृत योजने अंतर्गत” एकोणीस बाजारभाव संकलन केंद्रांसाठी सन २०२६-२७ करिता मंजूर निधीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.१३६/नापु-२५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ ऑगस्ट, २०२६.

**<u>वाचा</u>** :-१. केंद्र शासनाचे पत्र क्र. T-१०/१०/२०१९-PMC Section, दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ मार्गदर्शक सूचना.
२. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, अर्थसं-२०२५/प्र.क्र.१११/नापु-२५ दिनांक ०७ जुलै २०२६
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No. T-१०/२५/२०१८-PMC, दिनांक:- २१ जुलै, २०२६.

**<u>प्रस्तावना</u> :-**

“किंमत संनियंत्रण कक्षाचे बळकटीकरण (Strengthening of Price Monitoring Cell)” या १००% केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत (Planned Scheme) बाजारभाव संकलन केंद्रांनी संकलित केलेले बाजारभाव तत्परतेने पाठविण्यासाठी तसेच संनियंत्रण कक्षाचे बळकटीकरण/ दर्जा सुधारण्यासाठी केंद्र शासनाच्या (Strengthening of Price Monitoring Cell) दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ च्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील प्रत्येक बाजारभाव संकलन केंद्रांसाठी कंत्राटी तत्वावरील डाटा एंट्री ऑपरेटर (Data Entry Operator) ची नेमणूक करणे आणि स्मार्ट फोन व सिमकार्ड/ डाटा कार्ड खरेदी करणे, यासाठी केंद्र शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आली आहे. यानुसार सदर योजनेंतर्गत सन २०२६-२७ करिता घटकनिहाय तरतूद उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये “किंमत संनियंत्रण कक्षाचे बळकटीकरण (Strengthening of Price Monitoring Cell)” या १००% केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये रु. ५८,२६,०००/- तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली. वर्ष २०२५-२६ करिता प्राप्त निधीपैकी मार्च २०२६ अखेर अखर्चित रक्कम रु. २,४४,२७९/- वर्ष २०२६-२७ मध्ये खर्च करण्याकरिता केंद्र शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर अखर्चित रक्कमेपैकी रु. ७२,४००/- हे वर्ष २०२५-२६ करिता डाटा एंट्री ऑपरेटर यांचे प्रलंबित मानधन व रिचार्ज इ. करिता असून उर्वरित रक्कम रु. १,७१,८७९/- वर्ष २०२६-२७ करिता डाटा एंट्री ऑपरेटर यांच्या मानधन व डाटा कार्ड रिचार्ज इ. बाबींकरिता खर्च करण्यासाठी केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये “किंमत संनियंत्रण कक्षाचे बळकटीकरण करणे” या करिता राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, माणगाव-रायगड, धारणी-अमरावती,

लातूर, अकलूज-सोलापूर, आर्णी-यवतमाळ, चंद्रपूर, कराड-सातारा, राहुरी-अहमदनगर, खुलताबाद-औरंगाबाद, इस्लामपूर- सांगली, कणकवली-सिंधुदुर्ग, परतूर-जालना, गोंदिया, जळगाव व अकोला येथील एकोणीस बाजारभाव संकलन केंद्रांसाठी नियुक्त कंत्राटी तत्वावरील डाटा एंट्री ऑपरेटर यांची नेमणूक करणे आणि स्मार्ट फोन व सिमकार्ड/ डाटा कार्ड खरेदी करणे, यासाठी Price Stabilisation Fund या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी **परिशिष्ट "अ"** नुसार बाबनिहाय एकूण रु. ५६,२६,०००/- **(अक्षरी रुपये छप्पन्न लाख सव्वीस हजार फक्त)** इतके वित्तीय सहाय्य मंजूर केले आहे. यानुसार मागील वर्षाकरिता अखर्चित रक्कमेतील रु. ७२,४००/- वर्ष २०२५-२६ मधील प्रलंबित देयकांकरिता, तसेच उर्वरित अखर्चित रक्कम रु. १,७१,८७९/- व केंद्र शासनामार्फत मान्य रु. ५४,५४,१२१/- वर्ष २०२६-२७ करिता डाटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन, स्मार्ट फोन खरेदी व डाटा कार्ड रिचार्ज करणे इ. बाबींकरिता एकूण रु. ५६,९८,४००/- **(अक्षरी रुपये छप्पन्न लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे फक्त)** खर्च करण्यास मंजूरी दिली आहे. याबाबत जिल्हानिहाय तपशील **परिशिष्ट "ब"** नुसार आहे. यानुसार सदर निधी संबंधितांना वितरित करण्याची कार्यवाही वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग या कार्यालयामार्फत बाबनिहाय वितरित करण्यासाठी मान्यता या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे. उक्त खर्च खालील CNA खात्यावरील रकमेतून करण्यात यावा.

**"CNA खाते क्र. ४३७१६३७१८५९ , Agency Code- Maharashtra४०००"**

२. केंद्र शासनाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे, वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई, तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी व संबंधित अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे अंतर्गत संबंधित बाजारभाव संकलन केंद्रांना वितरित करण्यात आलेल्या निधीपैकी खर्च करण्यात आलेल्या तपशीलाच्या आधारे, निर्धारित कालावधीत विहित स्वरुपात उपयोगिता प्रमाणपत्र जी.एफ.आर. २०१७ (GFR २०१७) तसेच विहित स्वरुपात आर्थिक प्रगती प्रमाणपत्र (Financial Progress Certificate, Annexure-III) केंद्र शासनास व राज्य शासनास सादर करणे बंधनकारक आहे.

३. वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या दि. १९ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे परिच्छेद क्र. ३.२ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

४. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, केंद्र शासनाने मंजूर केलेले डाटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन व सिमकार्ड/ डाटा कार्ड ची सन २०२६-२७ करिता माहे मार्च २०२७ पर्यंतची रक्कम वितरित केली आहे. सदरची रक्कम माहे ऑगस्ट, २०२६ पर्यंत नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई, तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या खात्यावर वितरित करण्यात यावी. तसेच महालेखापाल कार्यालयांशी खर्चाचा ताळमेळ, विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन त्याबाबतचा अहवाल केंद्र शासनास व राज्य शासनास सादर करावा.

५. सदरील आदेश वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-१, अनुक्रमांक ६, नियम क्र. ४०(१) मधील तरतुदीनुसार प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८११११२४१६१२०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.08.11 11:25:48 +05'30'

**( प्रमोद पाटील )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२. उप आयुक्त (पुरवठा), नागपूर/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ कोकण/ अमरावती.
३. अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर/ पुणे/ सोलापूर.
४. जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक/ अमरावती/ रायगड/ लातूर/ नागपूर/ पुणे/ सोलापूर/ अहमदनगर/ औरंगाबाद/ चंद्रपूर/ सातारा/ यवतमाळ/ सिंधुदुर्ग/ जळगाव/ सांगली/ जालना/ अकोला/ गोंदिया.
५. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई, **उचित कार्यवाहीसाठी**.
६. महालेखापाल १/ २, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
७. महालेखापाल १/ २, (लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई.
१०. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/ अमरावती/ रायगड/ लातूर/ नागपूर/ पुणे/ सोलापूर/ अहमदनगर/औरंगाबाद/ चंद्रपूर/ सातारा/ यवतमाळ/ सिंधुदुर्ग/ जळगाव/ सांगली/ जालना/ अकोला/ गोंदिया.
११. अवर सचिव (कार्या-१४७५), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. निवड नस्ती (नापु-२५).

## परिशिष्ट “अ”

| बाब (Component) | प्रति बाजारभाव संकलन केंद्रास मंजूर संख्या | प्रति नग/ व्यक्ती मंजूर निधी (रुपये) | बाजारभाव संकलन केंद्रांची संख्या (नावे) | एकूण निधी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **(अ) अनावर्ती खर्च (२ वर्षातून एकदा)** | | | | |
| १) स्मार्ट फोन | ४ | ₹१०,०००/- | ४ ( मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक) | ₹४०,०००/- |
| | | | **एकूण (अ)** | **₹४०,०००/-** |
| **(ब) आवर्ती खर्च (प्रत्येक वर्षासाठी)** | | | | |
| १) सिमकार्ड/ डाटा कार्ड | १ | ₹६,०००/- | १९ (मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, धारणी-अमरावती, माणगाव-रायगड, लातूर, अकलूज-सोलापूर, राहुरी-अहमदनगर, खुलताबाद-औरंगाबाद, चंद्रपूर, कराड-सातारा, आर्णी-यवतमाळ, कणकवली-सिंधुदुर्ग, जळगाव, इस्लामपूर-सांगली, परतूर-जालना, अकोला व गोंदिया) | ₹१,१४,०००/- |
| २) कंत्राटी कर्मचारी (डाटा एंट्री ऑपरेटर) यांचे मानधन | १ | ₹२४००० x १२ महिने = ₹२,८८,०००/- | १९ (मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, धारणी-अमरावती, माणगाव-रायगड, लातूर, अकलूज-सोलापूर, राहुरी-अहमदनगर, खुलताबाद-औरंगाबाद, चंद्रपूर, कराड-सातारा, आर्णी-यवतमाळ, कणकवली-सिंधुदुर्ग, जळगाव, इस्लामपूर-सांगली, परतूर-जालना, अकोला व गोंदिया) | ₹५४,७२,०००/- |
| ३) राज्यात वर्कशॉप/सेमिनार / कॉन्फरन्स आयोजन करणे | | ₹१,००,०००/- | १ राज्यस्तरावर प्रशिक्षण | ₹०/- |
| | | | **एकूण (ब)** | **५५,८६,०००/-** |
| | | | **वर्ष २०२५-२६ मधील अखर्चित निधी* (क)** | **७२,४००/-** |
| | | | **एकूण (अ) + (ब) + (क)** | **५६,९८,४००/-** |

**(अक्षरी रुपये छप्पन्न लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे फक्त)**

**टीप :- * वर्ष २०२५-२६ मधील अखर्चित निधी रक्कम रु. २,४४,२७९/- पैकी रु. ७२,४००/- निधी हा वर्ष २०२५-२६ मधील डाटा एंट्री ऑपरेटर यांचे प्रलंबित मानधन व सिमकार्ड/ डाटा कार्ड रिचार्ज संबंधित आहे. या नुसार उर्वरित रक्कम रु. १,७१,८७९/- वर्ष २०२६-२७ करिता खर्च करण्यास केंद्र शासनामार्फत मान्यता प्राप्त आहे.**

**परिशिष्ट "ब"**

**राज्यातील १९ बाजारभाव संकलन केंद्रांसाठी नियुक्त कंत्राटी तत्वावरील डाटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन आणि स्मार्ट फोन व सिमकार्ड/ डाटा कार्ड खरेदी करणे इ. बाबींकरिता वर्ष २०२६-२७ करिता प्राप्त निधीबाबत जिल्हा/ केंद्र निहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | बाजारभाव संकलन केंद्राचे नांव | वर्ष २०२५-२६ मधील अखर्चित निधी तपशील | | | वर्ष २०२६-२७करिता बाबनिहाय निधी | | | | एकूण निधी (रकाना क्र. ४ व ९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अखर्चित निधी | वर्ष २०२५-२६ करिता प्रलंबित मानधन | मागील वर्षातील अखर्चित निधीपैकी २०२६-२७ करिता उपलब्ध निधी (रकाना क्र. ३-४) | अनावर्ती खर्च (२ वर्षातून एकदा) स्मार्ट फोन रु. १०,०००/- | आवर्ती खर्च (प्रत्येक वर्षासाठी) सिमकार्ड/ डाटा रु. ६,०००/- | कंत्राटी कर्मचारी डाटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन (रु. २४००० × १२ महिने = २,८८,०००/-) | एकूण (रकाना क्र. ६+७+८) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मुंबई | ₹ २,९९७ | ₹ ० | ₹ २,९९७ | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ ३,०४,००० | ₹ ३,०४,००० |
| २ | नागपूर | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ ३,०४,००० | ₹ ३,०४,००० |
| ३ | पुणे | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ ३,०४,००० | ₹ ३,०४,००० |
| ४ | नाशिक | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ ३,०४,००० | ₹ ३,०४,००० |
| ५ | माणगाव-रायगड | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| ६ | धारणी-अमरावती | ₹ ५६,५१७ | ₹ २४,००० | ₹ ३२,५१७ | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ ३,१८,००० |
| ७ | लातूर | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| ८ | अकलूज-सोलापूर | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| ९ | आर्णी-यवतमाळ | ₹ ६,००० | ₹ ६,००० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ ३,००,००० |
| १० | चंद्रपूर | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| ११ | कराड-सातारा | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| १२ | राहुरी-अहमदनगर | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| १३ | खुलताबाद-औरंगाबाद | ₹ १,०६५ | ₹ ० | ₹ १,०६५ | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| १४ | इस्लामपूर-सांगली | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |

| अ. क्र. | बाजारभाव संकलन केंद्राचे नांव | वर्ष २०२५-२६ मधील अखर्चित निधी तपशील | | | वर्ष २०२६-२७करिता बाबनिहाय निधी | | | | एकूण निधी (रकाना क्र. ४ व ९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अखर्चित निधी | वर्ष २०२५-२६ करिता प्रलंबित मानधन | मागील वर्षातील अखर्चित निधीपैकी २०२६-२७ करिता उपलब्ध निधी (रकाना क्र. ३-४) | अनावर्ती खर्च (२ वर्षातून एकदा) स्मार्ट फोन रु. १०,०००/- | आवर्ती खर्च (प्रत्येक वर्षासाठी) सिमकार्ड/ डाटा रु. ६,०००/- | कंत्राटी कर्मचारी डाटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन (रु. २४००० × १२ महिने = २,८८,०००/-) | एकूण (रकाना क्र. ६+७+८) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १५ | कणकवली-सिंधुदुर्ग | ₹ ३२,८०० | ₹ ० | ₹ ३२,८०० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| १६ | परतूर-जालना | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| १७ | गोंदिया | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| १८ | जळगाव | ₹ ४२,४०० | ₹ ४२,४०० | ₹ ० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ ३,३६,४०० |
| १९ | अकोला | ₹ २,५०० | ₹ ० | ₹ २,५०० | ₹ ० | ₹ ६,००० | ₹ २,८८,००० | ₹ २,९४,००० | ₹ २,९४,००० |
| | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (कार्यशाळा आयोजनाकरिता) | ₹ १,००,००० | ₹ ० | ₹ १,००,००० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० | ₹ ० |
| | Grant Total :- | ₹ २,४४,२७९ | ₹ ७२,४०० | ₹ १,७१,८७९ | ₹ ४०,००० | ₹ १,१४,००० | ₹ ५४,७२,००० | ₹ ५६,२६,००० | ₹ ५६,९८,४०० |

**टिप -**

१. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये मुंबई, नागपुर, पुणे व नाशिक केंद्रांसाठी हँड हेल्ड डिवाइस विथ जिओ टॅगिंग फॅसिलिटी अनावर्ती खर्च (५ वर्षातून एकदा) देण्यात आला आहे. यानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये या केंद्रांकरिता अनावर्ती खर्च (२ वर्षातून एकदा) स्मार्ट फोन खरेदीसाठी देण्यात येत आहे.

२. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये अकलूज- सोलापूर या केंद्रासाठी व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये माणगाव-रायगड, धारणी- अमरावती, लातूर, आर्णी-यवतमाळ, चंद्रपूर, कराड-सातारा, राहुरी-अमरावती, खुलताबाद-छत्रपती संभाजीनगर, इस्लामपूर-सांगली, कणकवली-सिंधुदुर्ग, परतूर-जालना, गोंदिया, जळगाव, अकोला या केंद्रांसाठी अनावर्ती खर्च (२ वर्षातून एकदा) स्मार्ट फोन साठी देण्यात आला आहे.